# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३३०-२२** **दिनांक ०६/११/२०२२**

## दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन एकुण ८७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या घटनामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मागदर्शनाच्या आधारे पेल्हार पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बतमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे दोन इसम १) चिराग मनोज मोरया वय- २० वर्षे, रा. रुम श्रीराम नगर, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, २) अरबाज लतीफ राईन, वय-१९ वर्षे, रा. बिलालपाडा, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले. नमुद आरोपीत यांना पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हा रजि.नं.९१६/२०२२ भां.द.वि.सं. कलम ३७९,३४ या गुन्हयात दिनांक ०३/११/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने आरोपीत यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी तुळींज पोलीस ठाणे हद्दीत देखील मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन नमुद आरोपीत यांचेकडुन ०२ मोटार सायकल असा एकुण ८७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.रजि.नं. I ९१६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९,३४ प्रमाणे. (मुळ गुन्हा) |
| २. | तुळींज पोलीस ठाणे. | गु.रजि.नं. I ६७२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शना खाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, यांनी केलेली आहे.